# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 21/07/2023 (शुक्रवार) सायंकाळ

---

### जबर दुखापत

**पो.स्टे. अरोली** :— अंतर्गत १५ किमी अंतरावर मौजा किरणापुर जंगली येथे दिनांक ०९/०७/२०२३ चे ०६.०० वा. ते ०६.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे— लक्ष्मण सिताराम धोतरे, वय ५५ वर्ष, रा. किरणापुर जंगली ता. मौदा जि. नागपुर हे एकाच गावातील राहणारे असुन दोघांची शेती ही एकमेकांचे धुऱ्याला लागुन असुन आरोपी नामे— महादेव मोरबाजी मेश्राम, रा. किरणापुर जंगली तो मौदा जि. नागपुर याने फिर्यादीच्या शेतामधुन नाली केली असल्याने फिर्यादीने हटकल्यावरून वाद झालेला होता. फिर्यादी हे गुऱ्हांचे शेणखत टोपल्यात भरून गावाबाहेर फेकण्या करिता आपले मोटरसायकलने जात असता यातील आरोपीने मागुन येवुन फिर्यादीच्या उजव्या पायावर काठीने मारल्याने तोल जावुन सिमेंट रोडवर खाली पडल्याने फिर्यादीच्या डाव्या खांदयाला व डाव्या टोंगळयाला जबर मार लागल्याने जखमी झाला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. अरोली येथे आरोपीविरुध्द कलम ३२४, ३२५ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक वाघमारे ७०३०१०९९६४ हे करीत आहे.

### मोटरसायकल चोरी

**पो.स्टे. पारशिवनी** :— अंतर्गत ०१ कि.मी. अंतरावरील मौजा वार्ड क्र. ३ पातीमाता मंदीर जवळ पारशिवनी येथे दिनांक १८/७/२०२३ चे १४/०० वा. ते १५/०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— शिवशंकर देवरावजी गिरडकर, वय ५५ वर्ष रा वार्ड क्र. ३ पातीमाता मंदीर जवळ पारशिवनी याने त्याची बजाज डिस्कव्हर दुचाकी क्र. एम. एच.— ४०/जी. —३९६७ काळया जांभळया रंगाची किंमती अंदाजे ८०००/— रू. ही त्याचे चुतल भाऊ नामे— नत्थु गिरडकर याला ०२ वर्षापुर्वी चालविण्याकरीता दिली तेव्हापासुन फिर्यादीचा चुतल भाऊ सदर गाडी वापरीत आहे. फिर्यादीच्या चुलत भावाने सदर मोटरसायकल ही घराच्या अंगणात उभी केली असता कोणीतरी अज्ञात चोराने सदर मोटरसायकल फिर्यादीच्या चुलत भावाचे घरासमोरील अंगणातुन चोरून नेली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. पारशिवनी येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक मंगेश ढबाले मो. क्र. ९९२३६२१२७५ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**